(58)

उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन
विभागाच्या अधिपत्याखालील सर्व शैक्षणिक
संस्थांमधून " विशेष मागास प्रवर्गाकरिता "
राखीव जागा ठेवणेबाबत

## महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग
शासन निर्णय क्रमांक : युएसजी–१४९३/(२४२८)–विशि–४
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई–४०० ०३२

दिनांक : २२ जून, १९९५

वाचा : (१) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग क्र. युएसजी–१४९३/२४२८/ विशि–४, दि. २३ जून, १९९४ व समक्रमांकित शुद्धिपत्रक दिनांक–जुलै १९९४.

(२) शासन निर्णय, समाजकल्याण सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्र. सीबीसी–१४९४/ प्र. क्र. २३६/मावक–५ दिनांक १३ जून, ९५ व समक्रमांकित शुद्धिपत्रक दिनांक १५ जून, १९९५.

(३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी–१०९४/प्र. क्र. ६८/९४/१६–ब, दिनांक १५ जून, १९९५.

१. **शासन निर्णय** : राज्यातील अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती म्हणून विवक्षितपणे घोषित करण्यात आलेले जनसमुदाय वगळता अन्य काही जातीजमातीकडून सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासलेल्या कारणावरुन विशेष सवलत देण्याची मागणी लक्षात घेता, शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक सीबीसी–१४९४/प्र. क्र. २३६/मावक–५, दिनांक १३ जून, १९९५ व समक्रमांकित शुद्धिपत्रक दिनांक १५ जून, १९९५ मध्ये विशिष्ट जातींचा " विशेष मागास प्रवर्ग " यामध्ये समावेश करण्याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. ज्या जातींचा " विशेष मागास प्रवर्गा " मध्ये समावेश करण्यात आला आहे त्याची यादी पारशिष्ट " अ " मध्ये देण्यात आली आहे.

२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी–१०९४/प्र. क्र. ६८/९४/१६–ब दिनांक १५ जून, १९९५ अन्वये " विशेष मागास प्रवर्गा " साठी २% आरक्षण शासकीय/निमशासकीय सेवेत ठेवण्याबाबतचे आदेश निर्गमित केले आहेत.

३. शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग क्र. युएसजी–१४९३/(२४२८) विशि–४, दिनांक २३ जून, १९९४ व समक्रमांकित शुद्धिपत्र दिनांक–जुलै, ९४ अन्वये इतर मागास वर्गासाठी अकृषि विद्यापीठे व संलग्नित शासकीय/अशासकीय कला, विज्ञान, वाणिज्य, शिक्षणशास्त्र व इतर शैक्षणिक संस्था यामधून प्रवेशासाठी आरक्षण ठेवण्याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. या आदेशानुसार शैक्षणिक संस्थांमध्ये राखीव जागा ५०% या प्रमाणात ठेवण्यात आलेल्या आहेत. आता काही विशिष्ट जाती जमातींचा " विशेष मागास प्रवर्गा " त समावेश करण्यात आलेला असल्यामुळे या प्रवर्गाकरिता २% जागा उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे अधिपत्याखालील सर्व शैक्षणिक संस्थांमधून या आदेशान्वये राखून ठेवण्यात येत आहे. " विशेष मागास प्रवर्गा " करिता राखून ठेवण्यात आलेल्या २% जागा वाढल्याने आता शैक्षणिक संस्थांमधून राखीव जागांचे प्रमाण खालीलप्रमाणे राहील :

| | | |
|---|---|---|
| (१) | अनुसूचित जाती व अनुसूचित जाती मधील बौद्धधर्म स्वीकारलेल्या व्यक्ती | १३% |
| (२) | अनुसूचित जमाती | ७% |
| (३) | विमुक्त जाती (१४ तत्सम जाती) | ३% |
| (४) | भटक्या जमाती (जानेवारी १९९० पूर्वीच्या २८ व तत्सम जाती) | २.५% |
| (५) | भटक्या जमाती (धनगर व तत्सम जमाती) | ३.५% |
| (६) | भटक्या जमाती (वंजारी व तत्सम जमाती) | २% |
| (७) | इतर मागास वर्गीयांकरिता (ओ. बी. सी.) | १९% |
| (८) | विशेष मागास प्रवर्ग | २% |
| | एकूण | ५२% |

हे आदेश १९९५–९६ या शैक्षणिक वर्षापासून लागू करण्यात येत आहेत.

४. सदर आरक्षण प्रत्येक संस्थांमध्ये अभ्यासक्रम निहाय असेल आणि ते गुणवत्ता आणि मूल्याधारित जागांकरिता त्यांच्या त्यांच्या प्रमाणात असेल.

आरक्षित जागा या प्रथमतः भरण्यात याव्यात. मात्र आरक्षित जागांवर प्रवेश मिळाला तरी गुणवत्तेनुसार त्या उमेदवारांच्या अभ्यासक्रम किंवा संस्था याबाबतच्या काही किंवा सर्व फक्त वरच्या पसंतीकरीता अराखीव जागांमधून प्रवेश देण्यासाठी त्यांच्या विनंतीनुसार पुनर्विचार करण्यात यावा.

५. शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश देताना एखाद्या प्रवर्गाचा उमेदवार न मिळाल्यास ते आरक्षण अनुशेष म्हणून पुढे ओढण्यात येत नसल्यामुळे व ते त्याच वर्षी भरावयाचे असल्यामुळे मागासवर्गीयांच्या इतर गटातील उमेदवारांना प्रवेश देवून आरक्षण पूर्ण करण्यात यावे. यासाठी दिनांक २७ जून, १९७४ च्या परिच्छेद २ मध्ये दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार कार्यवाही करण्यात यावी. मात्र अदलाबदलीने इतर प्रवर्गातून भरण्याची तरतुद करताना अशा तऱ्हेने उपलब्ध मागासवर्गीयांची संख्या मूळ आरक्षण अधिक अदलाबदलीने झालेले विद्यार्थी यांची संख्या धरुन ५२% पेक्षा अधिक असणार नाही.

६. शैक्षणिक वर्ष १९९५–९६ सुरू असल्यामुळे "विशेष मागास प्रवर्गा" त असणाऱ्या जातींमधून प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता त्यांनी ३१ जुलै, १९९५ पर्यंत शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्र. सीबीसी–१४९४/प्र. क्र. २३६/मावक–५, दिनांक १३ जून, १९९५ च्या जोडलेल्या परिशिष्ट "ब" मधील विवरण पत्रात जातीचे प्रमाणपत्र सक्षम अधिकाऱ्याकडून घेऊन संबंधित संस्थाप्रमुखांकडे सादर करणे बंधनकारक राहील. वरील तारखेपर्यंत जर या प्रवर्गातील विद्यार्थी त्यांच्या जातीचे प्रमाणपत्र शैक्षणिक संस्थाप्रमुखांना सादर करू शकले नाहीत तर, त्यांचा या राखीव जागांवर हक्क राहणार नाही. याचीही नोंद घेणे आवश्यक आहे.

७. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांना विनंती करण्यात येते की, हे आदेश सर्व शैक्षणिक संस्थाचालकांच्या निदर्शनास आणून द्यावेत.

हे आदेश सामान्य प्रशासन विभागाच्या व समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभागाच्या संमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

त्रि. ब. सेन
उप सचिव, महाराष्ट्र शासन

## परिशिष्ट—"अ"

शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक सीबीसी–१४९४/प्र. क्र. २३६/मावक–५, दिनांक १३ जून, १९९५ व समक्रमांकित शुद्धिपत्र दिनांक १५ जून, १९९५ अन्वये "विशेष मागास प्रवर्ग" अंतर्गत करण्यात आलेली जातींची यादी.

| अ. क्र. | जातीचे नाव |
|---|---|
| १. | गोवारी, गवारी. |
| २. | माना. |
| ३. | (१) कोष्टी, (२) हलबा कोष्टी, (३) हलबा जात, (४) साळी, (५) लाडकोष्टी, (६) गढेवाल कोष्टी, (७) देशकर, (८) सालेवार, (९) पद्मशाली, (१०) देवांग, (११) काची वंध, (१२) पटवीस, (१३) सतसाले, (१४) साडे, (१५) जैनकोष्टी. |
| ४. | (१) कोळी, तत्सम जाती, (२) मच्छिमार कोळी, (३) अहीर कोळी, (४) खानदेशी कोळी, (५) पानकोळी, (६) ख्रिश्चन कोळी, (७) चुंबळे कोळी, (८) पानभरे कोळी, (९) सूर्यवंशी कोळी, (१०) मगिला कोळी, (११) सोनकोळी, (१२) वैती कोळी, (१३) खाल्वी, (१४) अनुसूचित जमातीमध्ये समावेश नसलेले कोळी. |
| ५. | (१) मुन्नेरवार, (२) मुन्नुरवार, (३) मुन्नुर, (४) तेलगु मुन्नुर, (५) मुन्नुरवार तेलगु, (६) मुन्नरकापू, (७) कापेवार, (८) तेलगु कापेवार, (९) मुन्नरवाड, (१०) तेलगु फुलमाळी, या जाती. |

पुणे विद्यापीठ, पुणे ७

संदर्भ क्र. आरक्षण / ४२ / ५३३

आरक्षण कक्ष
दिनांक : २२–७–९५.

मा. प्राचार्य / संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये,
सर्व मान्यताप्राप्त संस्था.

महोदय,

वरील शासन निर्णय आपणांकडे माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठवीत आहे.

कळावे,

आपला विश्वासू,
सही/–
उपकुलसचिव,
आरक्षण कक्ष

उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभागातील
अधिपत्याखाली सर्व तंत्र शिक्षण संस्थामधून
" विशेष मागास प्रवर्गाकरिता " राखीव जागा
ठेवणेबाबत.

## महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग
शासन शुद्धिपत्रक क्रमांक विशएस ३३९५/११४०७/(६९४०) तांशि १
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई–४०० ०३२.
दिनांक २१ मार्च, १९९६

संदर्भ :—(१) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग
क्रमांक : युएसजी १४९३/(२४३८) विशि–४
दिनांक २२ जून, १९९५

**शासन शुद्धिपत्रक :—**

संदर्भाधीन दिनांक २२ जून, १९९५ च्या शासन निर्णयान्वये शासकीय/अनुदानित/विद्यापीठ व्यवस्थापित/विना अनुदानित संस्थांतील अभियांत्रिकी/वास्तुशास्त्र/औषधनिर्माण शास्त्र वा व्यवस्थापन शास्त्र इत्यादी व्यावसायिक विद्याशाखांच्या पदवी/पदविका अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षाचे प्रवेश करण्यासाठी मागासवर्गीयांकरिता आरक्षणाचे प्रमाण शासनाने यापूर्वीच खालीलप्रमाणे विहित केले आहे.

| | |
|---|---|
| (१) अनुसूचित जाती व अनुसूचित जातींतील बौद्ध धर्म स्वीकारलेल्या व्यक्ती | १३ टक्के |
| (२) अनुसूचित जमाती | ७ टक्के |
| (३) विमुक्त जाती (१४ तत्सम जाती) | ३ टक्के |
| (४) भटक्या जमाती (जानेवारी १९९० पूर्वीच्या २८ व तत्सम जमाती) | २.५ टक्के |
| (५) भटक्या जमाती (धनगर व तत्सम जमाती) | ३.५ टक्के |
| (६) भटक्या जमाती (वंजारी व तत्सम जमाती) | २ टक्के |
| (७) इतर मागासवर्गीय (ओ.बी.सी.) | १९ टक्के |
| (८) विशेष मागासवर्गीय प्रवर्ग (एस.बी.सी) | २ टक्के |
| | एकूण : ५२ टक्के |

संदर्भाधीन दिनांक २२ जून, १९९५ च्या शासन निर्णयातील परिच्छेद ४, ५ व ६ मध्ये खालील-प्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत :—

१. परिच्छेद क्र. ४ :—उपरोक्त आरक्षण प्रत्येक संस्थेत अभ्यासक्रमनिहाय असेल व ज्या अभ्यासक्रमांच्या प्रवेश पद्धतीत मुक्त व मुल्यभारीत प्रकाराच्या जागा असतात त्या अभ्यासक्रमाच्या प्रवेशा-साठी प्रत्येक प्रकारास त्या त्या प्रमाणात लागू पडेल.

परिच्छेद क्र. ५ :—संवर्गनिहाय आरक्षित जागा प्रथमतः भरण्यात याव्यात. एखाद्या मागासवर्गीय संवर्गातून उमेदवार उपलब्ध नसतील तर त्या संवर्गातील रिक्त जागा उर्वरीत संवर्गाच्या एकत्रित यादीतील गुणवत्तानुक्रमानुसार पूर्व नियोजित वेळी उपस्थित राहणाऱ्या उमेदवारांचा त्यांच्या विनंतीवरुन दुसऱ्या चांगल्या पसंतीच्या जागेवर प्रवेश बदल देण्यासाठी पुर्नविचार करण्यात यावा.

मागासवर्गीयांसाठी आरक्षित असलेल्या जागांवर प्रवेश घेतलेले उमेदवार सर्वसाधारण गुणवत्तानु-क्रमानुसार खुल्या जागांवरील प्रवेशासाठी देखील पात्र राहतील. खुल्या जागेवर प्रवेश देतांना पूर्वीची संस्था अभ्यासक्रम तंतत अबाधित राहत असेल तर सर्व सवलतींसह अशा प्रवेशांची समस्तरपालट करण्यात येऊन अशा उमेदवारांना खुल्या जागांवर प्रवेश मिळाला आहे असे समजण्यात यावे. त्यासाठी उमेदवाराने उपस्थित राहण्याची किंवा पसंती/इच्छा कळविण्याचा प्रश्न उद्‌भवणार नाही. परंतु राखीव जागेवर प्रवेश झाला त्याक्षणी स्वतःचे पसंतीनुसार उपलब्ध नसलेल्या जागेवर खुल्या संवर्गातून प्रवेश मिळण्यासाठी पुनर्विचार व्हावा अशी इच्छा असेल तर मात्र उमेदवारास खुल्या जागांसाठी होणाऱ्या प्रवेश प्रक्रियेच्या पूर्वनियोजित वेळापत्रकानुसार आपल्या सर्वसामान्य गुणवत्तानुक्रमानुसार उपस्थित राहणे आवश्यक राहील. अन्यथा अशा प्रवेश पालटासाठी त्यांचा पुनर्विचार करता येणार नाही.

परिच्छेद क्र. ६ :—मागासवर्गीय उमेदवारांचे सर्वसाधारण गुणवत्तानुक्रमानुसार खुल्या जागांसाठी प्रवेश करतांना संस्थेत/अभ्यासक्रमात मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे प्रमाण शासन निर्धारित प्रमाणापेक्षा अधिक झाले तर त्यास कोणतीही हरकत राहणार नाही.

२. हे शुद्धिपत्रक सामान्य प्रशासन विभागाच्या संमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

(ओं. शि. बिहाडे)
सहसचिव, महाराष्ट्र शासन

### पुणे विद्यापीठ, पुणे ७

संदर्भ क्र. आरक्षण / ४२ / ३७०

आरक्षण कक्ष
दिनांक : ८–७–९६.

मा. प्राचार्य / संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये, / मान्यताप्राप्त संस्था.

महोदय,

वरील शासन निर्णय आपणाकडे माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठवीत आहे.

कळावे,

आपला विश्वासू,
सही/–
उपकुलसचिव,
आरक्षण कक्ष

**To provide reserved seats for ' Specially backward Class' in the educational institutions governed by Higher Education and Employment Planning Department**

**Government of Maharashtra**
**Higher & Technical Education and Employment –Section**
**Government Resolution No. :- USG-1493/2428-VS-4**
**Ministry of state, Extension House, Mumbai – 400-032**
**Dated 22 Jun, 1995**

**Read :- 1.** Government Resolution, Higher & Technical and Employment Planning Dept. No. USG-1493/2428/VS/-4 Dated 23rd June, 1994 and same numbered corrigendum Dated- July, 1994.

**2.** Government Resolution, Social welfare, cultural and sport Dept. No. CDC- 1494/ P.N. 338/BCC-5 Dated 13 June, 1995 and same numbered corrigendum dated 15th June 1995.

**3.** Government Resolution Generals Administration Department No. VCC-1094/P.G.68/94/16 dated 15th June 1995.

**Government Resolution: -1.** Excluding the scheduled castes and scheduled tribes in the state some other castes and tribes demanded special concession on the basis of socially financial and educationally backward grounds. Considering their demands an order related to inclusion of specific castes in special backward class has been issued in the Government Resolution, Social Welfare, Cultural & Sports Dept. No. CVC-1494/P.No.236 BCC-5 dated 13th June, 1995 & same numbered corrigendum dated 15th June 1995. The list of the castes included in special backward classes has been given in Annexure 'A' enclosed.

**2.** As per Government Resolution, General Administration Section No. VCC-1094/P.No.-68/94/16-W dated 15th June 1995 2% reservation be provided to 'Special Backward Class' for the purpose of appointment in Government /Semi Government Services such order have been issued in the aforesaid G.R.

**3.** As per the order issued in Government Resolution Higher & Technical Education and Employment Planning Dept. No. US6-1493/C2428)-WS-4/dated 23rd June 1994 and same numbered corrigendum dated – July 1994 50 % seats be reserved for the students belonging to other backward classes for the purpose of admission to non-agriculture universities and affiliated government /non-government and Arts , Science and Commerce, Education and other educational institution. As some special castes have been included in 'Special Backward Class', 2 % seats have been reserved for such classes in all the education institution run under the governance of Higher & Technical Education Department. On account of issuance of such order pertaining to increase of 2 % reservation provided to 'Special Backward Class' the proportion of reserved seats in educational institution shall be as under.

1. The persons, accepted Buddha Religion, from schedule caste and schedule tribes – 13 %

2. Schedule Tribes – 07 %
3. Vimukta Jati (14 Similar Jati) – 03 %
4. Nomadic Tribes (Prior to January 1990 and Similar castes) – 2.5 %
5. Nomadic Tribes ( Dhangar and similar Jamati) – 3.5 %
6. Nomadic Tribes ( Wanjari and Similar Jamati) – 2 %
7. Other Backward Class (OBC) - 19 %
8. Special Backward Class – 2 %

----------------------

52 %

These orders have come in to effect from the session 1995-96.

**4.** The concerned reservation shall be provided program wise in every institution and it will be proportionate to free and paid seats respectively.

The reserved seats be filled in with priority. But even after seeking admission through reserved seat the application of the candidate is considered to the course or institution on the basis of merit or to avail of the upper choices available through unreserved seats his application be considered on his request.

**5.** While admitting a candidate if a reserved seat for any class remained vacant on account of non-availability of a suitable candidate, such a seat is filled in by selecting candidate from the other groups included in backward classes. For this purpose refer to para 2$^{nd}$ of the government resolution dated 27$^{th}$ June 1994 and do the needful action in accordance with the guidelines provided in the aforesaid G.R. But while filling in such posts by reshuffling the candidates from other classes the basis figure of 52 % of total reservation should the not be exceeded.

**6.** As the academic session 1995-96 has already commenced the students, belong to Special Backward Class, willing to seek admission should submit Annexure 'B' up to 31st July 1995 as provided in the Government Resolution No.CVC-1494/p.n.236/BCC-5, dated 13th June 1995 issued by the Social Welfare, Cultural and Sports Department. It is mandatory on the part of such students to submit the particulars related to their castes vide Annexure 'B' to the concerned management. If they fail to submit it within the mentioned date to the head of the institution, they should take note that they shall lose their claim on the reserved seats.

**7.** It is requested that the Director, Higher Education Pune, should bring these orders to the notice of the Management of all the education institutions.

This order is being circulated with the permission of Social Welfare, Cultural and Sports Department of General Administration

As per the order issued by the Governor state of Maharashtra, and name.

Signature /-
( Tri. W. Sen)
Asst. Secretary Maharashtra Government

**Copy to:-**

Secretary to Governor
Secretary to Chief Minister
All the Vice-Chancellors of Non-agriculture Universities
All the Registrars of Non-agriculture Universities
Director, Higher Education, Maharashtra state, Pune -5 copies
Director, Technical Education, Maharashtra state, Mumbai
All Joint-Director Higher Education, of all Divisions.
Director, Vocational Education / Training Maharashtra state Mumbai
Personal Secretary to Hon. Minister (H.E)
Personal Secretary to state Minister of Higher Education
All the Desk officers of Higher and Technical Education Dept.
General Administration Section / Social Welfare, Cultural and sports Department B.C.C. Ministry of state Mumbai.
All the Divisional Deputy Directors, Technical Education/ Vocational Education & Training.
Director Social Welfare, Maharashtra State, Pune 2 copies.

**Annexure-A**

The list of the castes, prepared in accordance with the provision of "Special backward Class" mentioned in the same numbered corrigendum published on 15th June 1995 in pursuance to the original Government Resolution no.CVC-1494/p.n.236/BCC-5, dated 13th June 1995 issued by the Welfare, Cultural and Sports Department of Maharashtra State, is given below.

| Sr. No | Name of caste |
|---|---|
| 1. | Gowari |
| 2. | Mana |
| 3. | 1) Koshti, 2) Halba Koshti, 3)Halba Jat, 4)Sali, 5)Ladkoshti, 6) Gadhewal koshti, 7) Deshkar, 8) salewar, 9)Padmawati, 10) Devang, 11) Bandhe, 12)Patwis, 13) Satsale 14) Sade, 15) Jinkoshti. |
| 4. | 1) Koli, Tatsam Jati, 2) Machhimar Koli, 3)Ahir Koli, 4)Khandeshi Koli, 5) Pankoli, 6) Khrischan Koli, 7)Shunware Koli, 8) Panbhare Koli, 9) Suryawanshi Koli, 10) Mangela Koli, 11) Sonkoli, 12) Veli koli, 13) Kharavi, 14) Koli excluding Anusuchit Jamati. |
| 5. | 1) Munnerwar, 2) Munnurwar, 3)Munnur, 4)Telagu Munnur, 5)Munnurwar Telagu, 6)Munnurkapu,7)Kapewar, 8)Telagu Kapewar. 9)Munnurwad, 10)Telagu Fulmali all these castes. |